# वानखेडेवर मुंबईचाच दबदबा

## अडीच दिवसांत चंडीगडचा डावाने धुव्वा; शम्स-तनुषची फिरकी प्रभावी

**अन्वय सावंत, लोकसत्ता**




**मुंबई :** गेल्या काही वर्षांत मुंबई रणजी संघाने घरचे सामने खेळण्यासाठी ‘एमसीए-बीकेसी’ मैदानाला प्राधान्य दिले असले, तरी वानखेडे स्टेडियमवरही आपण वर्चस्व गाजवू शकतो, हे त्यांनी सिद्ध केले. पहिल्या डावात वेगवान गोलंदाजांच्या भेदकतेनंतर दुसऱ्या डावात तनुष कोटियन (३/३०) आणि शम्स मुलानी (३/६९) या फिरकीपटूंनी केलेल्या प्रभावी माऱ्याच्या जोरावर मुंबईने चंडीगड संघाचा अडीच दिवसांतच एक डाव आणि १५५ धावांनी धुव्वा उडवत रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या नव्या हंगामात विजयी सलामी दिली.

मुंबईने प्रथम फलंदाजी करताना ४२९ धावांची मजल मारल्यानंतर चंडीगडचा पहिला डाव अवघ्या ७८ धावांत आटोपला. फॉलोऑन मिळाल्यानंतर चंडीगडने दुसऱ्या डावात चिवट प्रतिकार केला. मात्र, सामन्याच्या तिसऱ्या दिवशी (मंगळवारी) पहिल्या तासाभराच्या खेळानंतर त्यांनी ठरावीक अंतराने गडी गमावण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्यांचा दुसरा डाव चहापानाच्या विश्रांतीपूर्वीच १९६ धावांत संपुष्टात आला आणि मुंबईने बोनससह सात गुणांची कमाई केली. फलंदाजीत ४४ धावा, तर गोलंदाजीत दोन डावांत मिळून हॅट्ट्रिकसह सात बळी मिळवणारा तुषार देशपांडे सामनावीराच्या पुरस्काराचा मानकरी ठरला.

### संक्षिप्त धावफलक

- **मुंबई (पहिला डाव) :** ४२९
- **चंडीगड (पहिला डाव) :** ७८
- **चंडीगड (दुसरा डाव) :** ५२.१ षटकांत सर्वबाद १९६ (अर्जुन आझाद ६२, शिवम भांबरी ४४, अर्सलान खान २०; तनुष कोटियन ३/३०, शम्स मुलानी ३/६९, तुषार देशपांडे २/३७)
- **सामनावीर :** तुषार देशपांडे.

### आयुष म्हात्रे पुन्हा जायबंदी

- चंडीगडविरुद्धच्या लढतीत मुंबईचा उपकर्णधार आणि सलामीवीर आयुष म्हात्रेला पायाची दुखापत झाली आहे. पहिल्या दिवशी फलंदाजीदरम्यान धाव घेताना आयुषच्या उजव्या मांडीच्या मागील बाजूचे स्नायू ताणले गेले. त्याने पुढील दोन दिवस क्षेत्ररक्षण केले नाही.
- दुखापतीतून सावरल्यानंतरच्या पहिल्याच स्पर्धात्मक सामन्यात आयुष पुन्हा जायबंदी झाला असून त्याला एक ते दीड महिना मैदानापासून दूर राहावे लागू शकेल असे समजते.

## गिल, शफालीला ‘आयसीसी’चा पुरस्कार




**दुबई :** भारतीय पुरुष संघाचा कर्णधार शुभमन गिल आणि महिला संघाची सलामीची फलंदाज शफाली वर्मा यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचा (आयसीसी) महिन्यातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार जाहीर झाला आहे. सप्टेंबर महिन्यात वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील गिलची दमदार कामगिरी, तर आशिया चषक व आशियाई क्रीडा स्पर्धेतील शफालीचे योगदान यामुळे दोघांची अनुक्रमे पुरुष आणि महिला गटातील पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

गिलने पाचव्यांदा हा पुरस्कार पटकावत वेस्ट इंडिजची कर्णधार हेली मॅथ्यूज हिच्या विक्रमाशी बरोबरी केली. यापूर्वी त्याला जानेवारी आणि सप्टेंबर २०२३, तसेच फेब्रुवारी आणि जुलै २०२५ मध्ये हा सन्मान मिळाला होता.

# पुन्हा शीर्ष फळीवर मदार

## भारत-विंडीज चौथा ट्वेन्टी-२० सामना आज




**हैदराबाद :** चांगल्या लयीत असलेल्या भारतीय फलंदाजांचा प्रयत्न वेस्ट इंडिजविरुद्ध आज, बुधवारी होणाऱ्या चौथ्या ट्वेन्टी-२० सामन्यात मालिकेत विजयी आघाडी घेण्याचा असेल. भारतीय संघ पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ असा आघाडीवर आहे. मालिका जिंकण्यासाठी त्यांना केवळ एका विजयाची आवश्यकता आहे. दुसरीकडे, विंडीजचे लक्ष्य या सामन्यात विजय नोंदवत मालिकेत बरोबरी साधण्याचे असेल. पुन्हा एकदा दोन्ही संघांची मदार आक्रमक फलंदाजांवर असणार आहे.

भारताने या मैदानावर यापूर्वीचा ट्वेन्टी-२० सामना बांगलादेशविरुद्ध २०२४ मध्ये खेळला होता. भारताने त्यावेळी सहा बाद २९७ धावा करीत १३३ धावांनी विजय मिळवला होता. संजू सॅमसनने या लढतीत ४३ चेंडूंत १११ धावा केल्या होत्या.

### सॅमसन, अभिषेक, किशनकडे लक्ष

भारताच्या शीर्ष फळीतील फलंदाज संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि इशान किशनने आतापर्यंत चमकदार कामगिरी केली आहे. त्यामुळे मालिकेत आतापर्यंत मध्यक्रमावर अधिक दबाव आलेला नाही. अभिषेकने इंदूरमध्ये तिसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात ३० चेंडूंत ६९ धावा केल्या होत्या. यादरम्यान त्याने सहा चौकार व पाच षटकार लगावले होते. मध्यक्रमातील फलंदाजांना फारसा सराव न मिळाल्याची चिंता भारतीय संघ व्यवस्थापनाला असेल. शीर्ष तीन फलंदाज अपयशी ठरल्यास तिलक वर्मा, नितीश कुमार रेड्डी आणि नमन धीर यांना जबाबदारी संभाळावी लागेल. भारतीय गोलंदाजांना आपली कामगिरी उंचवावी लागेल. गेल्या लढतीत अर्शदीपने तीन गडी बाद केले होते.

### विंडीजकडून सातत्यपूर्ण कामगिरी अपेक्षित

विंडीजचा सलामी फलंदाज शेरफेन रुदरफोर्डने आतापर्यंत १८९च्या स्ट्राईक रेटने १७२ धावा केल्या. त्याने तीन सामन्यांत १२ षटकार लगावले. कर्णधार शे होपने १८२च्या स्ट्राईक रेटने १५९ धावांची भर घातली. जगज्जेत्या भारताविरुद्ध विजय मिळवायचा झाल्यास विंडीजला सर्वश्रेष्ठ कामगिरी करावी लागेल. इंदूरच्या सामन्यात शिमरोन हेटमायर (४३), कामिल पूरन (४२) आणि स्प्रिंगर (नाबाद ३५) यांनी चांगली फलंदाजी केली. त्यांच्या गोलंदाजांकडेही सर्वांचे लक्ष असणार आहे.

- **वेळ :** सायं. ७ वा.
- **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

## महाराष्ट्राला पहिल्या डावात आघाडी

**नवी दिल्ली :** सेनादलाविरुद्ध सुरू असलेल्या रणजी करंडक ‘क’ गटातील सामन्यात दुसऱ्या डावात ५ बाद ६६ अशी पडझड झाल्यानंतरही महाराष्ट्राने पहिल्या डावातील १०६ धावांची आघाडी तिसऱ्या दिवसअखेरीस १७२ धावांपर्यंत वाढवत आपली बाजू सुरक्षित केली.

दुसऱ्या दिवसअखेरच्या १ बाद ७४ अशा सावध सुरुवातीनंतर तिसऱ्या दिवशी पुढे खेळायला सुरुवात केल्यानंतर सेनादल संघाला १५३ धावांचीच भर घालता आली. सलामीचा फलंदाज नितीन तन्वर (६१) याच्यानंतर त्यांच्या मधल्या फळीत प्रमुख फलंदाजांना आलेले अपयश त्यांच्यासाठी मारक ठरले. विनीत धनकरला (४०) साथीला घेत नितीनने सेनादलचा डाव सावरला होता. या जोडीच्या चौथ्या गड्यासाठी झालेली ६४ धावांच्या भागीदारीनंतर मात्र त्यांच्या डावात काहीच घडले नाही. ओस्तवालने विनीतला बाद करून ही जोडी फोडली. डावात पाच बळी घेणाऱ्या वाळुंजने नितीनचा अडसर दूर केला. त्यानंतर केवळ कर्णधार रजत पालिवाल (४४) यालाच तग धरता आला. अन्य एकही फलंदाज दोन आकड्यात मजल मारू शकला नाही. वाळुंजने ५१ धावांत ५ गडी बाद केले. सेनादलाचा डाव २२७ धावांवर गुंडाळून महाराष्ट्राने पहिल्या डावात १०६ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी घेतली.

## विदर्भाकडून मोखाडेची चमक



**नागपूर :** पार्थ रेखाडे आणि अमन मोखाडे यांच्या गोलंदाजीच्या जोरावर विदर्भाने रणजी करंडक स्पर्धेत पुदुच्चेरीला ३१३ धावांत रोखून पहिल्या डावात ११५ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी घेण्यात यश मिळविले. विदर्भाच्या ४२८ धावांना उत्तर देताना रितेश गुडगे (९५), निखिल गंगटा (५४) आणि मोहित काळे (७८) यांच्या प्रयत्नांना अन्य फलंदाजांची साथ न मिळाल्याने पुदुच्चेरीला पहिल्या डावात पिछाडीवर रहावे लागले.

गुडगे आणि गंगटा यांनी दुसऱ्या गड्यासाठी १४५ धावांची चिवट भागीदारी केली. मात्र, ही जोडी फुटल्यावर मोहितशिवाय एकही पुदुच्चेरीचा एकही फलंदाज खेळपट्टीवर टिकू शकला नाही. पार्थने गंगटाला बाद करून ही जोडी फोडली. त्यानंतर दुबेने गुडगेचा अडथळा दूर केला. गुडगे शतकापासून केवळ पाच धावा दूर राहिला. नियमित फलंदाज असलेल्या अमन मोखाडेचा बदली गोलंदाज म्हणून वापरण्याचा कर्णधार वाडकरचा निर्णय कलाटणी देणारा ठरला. मोखाडेने आपल्या लेग ब्रेक गोलंदाजीने तीन गडी बाद केले. पार्थने ६४ धावांत तीन गडी बाद केले. विदर्भाने त्यानंतर दिवसभराच्या उर्वरित खेळात आपल्या दुसऱ्या डावात १ बाद २२ धावा केल्या. अमन मोखाडे १५, तर हर्ष दुबे शून्यावर खेळत होता. विदर्भाकडे आता १३७ धावांची आघाडी आहे.

## पहिल्याच फेरीत सिंधू, लक्ष्य गारद

**ओडेन्स :** भारताची ऑलिम्पिक पदकविजेती पीव्ही सिंधू तसेच, लक्ष्य सेन यांना डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या (सुपर ७५०) पहिल्याच फेरीतून गाशा गुंडाळावा लागला. तर, किदम्बी श्रीकांत आणि तन्वी शर्मा यांनी अनुक्रमे पुरुष व महिला एकेरीच्या पुढच्या फेरीत आगेकूच केली.

लक्ष्यकडून पुरुष एकेरीच्या लढतीत खूप अपेक्षा होत्या. मात्र, त्याला चायनिज तैपेइच्या तिसऱ्या मानांकित चोऊ टिएन शेनकडून १८-२१, २१-१३, १५-२१ असे पराभूत व्हावे लागले. सामन्यातील पहिला गेम जिंकत शेनने चांगली सुरुवात केली. दुसऱ्या गेममध्ये लक्ष्यने आपला खेळ उंचवाताना २१-१३ अशी बाजी मारत सामना बरोबरीत आणला. तिसऱ्या गेममध्ये शेनने त्याला संधी न देता गेमसह सामना जिंकला. महिला एकेरीत जर्मनीच्या य्वोन लीने अनपेक्षित निकालाची नोंद करताना सिंधूला तीन गेमपर्यंत चाललेल्या चुरशीच्या लढतीत १३-२१, २५-२३, २१-१९ असे नमविले. सामन्यातील पहिला गेम सहज जिंकत सिंधूने लयीत असल्याचे दाखवले. मात्र, दुसऱ्या गेममध्ये ली हिने आपला खेळ उंचावताना सिंधूला निष्प्रभ केले. दुसरा गेम २५-२३ असा जिंकत तिने लढत निर्णायक गेमपर्यंत नेली. तिसऱ्या गेममध्येही एकवेळ सिंधू आघाडीवर होती आणि सहज जिंकेल असे दिसत होते. मात्र, ली ने हार न मानता सलग गुणांची कमाई करीत गेमसह सामना जिंकला. महिला एकेरीत तन्वीने नात्सुकी निदाइराला २१-१७, १६-२१, २१-१९ असे नमविले. तर, श्रीकांतने फ्रान्सच्या अर्नाउड मर्कलेवर २२-२०, २१-१९ असा विजय मिळवला.




### आयटी, बँकिंगच्या जोरावर

# ‘सेन्सेक्स’ची १,१०९ अंशांची मुसंडी

**मुंबई :** मंगळवारी देशांतर्गत शेअर बाजारात तेजीवाल्यांनी जोरदार पुनरागमन केले. माहिती-तंत्रज्ञान (आयटी), वित्तीय आणि ग्राहकोपयोगी वस्तू (एफएमसीजी) क्षेत्रातील समभागांमधील तेजी, रुपयातील सुधारणा आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ‘एलटीसीजी’कराच्या फेरविचाराबाबत केलेल्या विधानामुळे मुख्य निर्देशांक सेन्सेक्स १,१०९ अंशांनी वधारला, तर निफ्टी २२,७२० पातळीच्या पुढे बंद झाला.

मंगळवारच्या सत्रात सेन्सेक्स १,१०९.१० अंशांनी वधारून ७३,०३३.७८ या सत्रातील उच्चांकाच्या जवळ बंद झाला. गेल्या चार महिन्यांतील ही एका दिवसातील सर्वात मोठी वाढ ठरली. दिवसाच्या सत्रात हा निर्देशांक १,१२०.९९ अंशांनी वधारून ७३,०४५.६७ या उच्चांकावर पोहोचला होता. निफ्टी ३५८.६० अंशांनी वधारून २२,७२१.९५ पातळीवर बंद झाला. गेल्या दोन महिन्यांहून अधिक काळातील ही निफ्टीची एका दिवसातील सर्वोत्तम कामगिरी ठरली.

तंत्रज्ञान कंपन्यांच्या अपेक्षेपेक्षा अधिक चांगल्या कामगिरीमुळे कंपन्यांचा नफा वाढीवरील विश्वास वाढला आणि वजनदार कंपन्यांच्या समभागांना मागणी आल्याने शेअर बाजारात तेजी आली. रुपयाची स्थिरता आणि रोख्यांमधील घसरणीमुळे बाजारातील भावनांना आणखी आधार मिळाला. शिवाय दीर्घकालीन भांडवली नफा कर (एलटीसीजी) आणि रोखे व्यवहार कर (एसटीटी) याबाबत फेरविचारास सकारात्मकता दर्शवणाऱ्या अर्थमंत्र्यांच्या वक्तव्यामुळे देखील बाजारात उत्साह संचारला. ‘ब्लू-चिप’ समभागांमध्ये खरेदीला चालना मिळाली, ज्यामुळे प्रमुख निर्देशांक दिवसाच्या उच्चांकी पातळीजवळ बंद होण्यास मदत झाली, असे निरीक्षण जिओजित इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेडचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी व्यक्त केले. खनिज तेलाच्या किमती उच्च पातळीवर असूनही, अमेरिकेच्या १०-वर्षीय मुदतीच्या रोख्यांवरील परतावा दरात ५.२ टक्क्यांखाली झालेली घट यामुळे समभागांच्या किमतींवरील दबाव कमी होण्यास मदत झाली, असेही त्यांनी नमूद केले. सेन्सेक्समधील आघाडीच्या ३० कंपन्यांपैकी, एचसीएल टेकच्या समभागांत ८.२८ टक्क्यांची वाढ झाली. या आयटी कंपनीने आर्थिक वर्ष २०२७ च्या जुलै-सप्टेंबर तिमाहीसाठी एकत्रित निव्वळ नफ्यात २१.१८ टक्क्यांची वाढ नोंदवून तो ५,१३२ कोटी रुपयांवर नेला होता. प्रगत कृत्रिम प्रज्ञेतून (एआय) मिळणारा अधिक नफा आणि कराचा कमी बोजा याचा कंपनीला फायदा झाला.

**PUNYASHLOK AHILYADEVI HOLKAR SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR**
Solapur Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255 (Maharashtra)
Mobile: 9152252026/9152252077/9152252049
Email: pahsuphd@admissiondesk.org/phd@sus.ac.in
Web: http://sus.ac.in

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
NAAC Accredited - 2022 'B++' Grade (CGPA 2.96)

**Online application for PAHSUS-PET-10 (2026)**
**The Entrance Examination for Ph.D. Programme**

Online applications are invited from eligible candidates for above entrance examination. The details of Research Guides and seats available are uploaded on the University website.

The online application forms and the relevant details are made available on the link provided on the University website **http://sus.ac.in** under **PET-10-(2026)** from 14/10/2026 to 16/11/2026.

Sd/-
(Dr. Shrikant G. Andhare)
Director Board of Examination & Evaluation

Place: Solapur
Date: 14/10/2026

**Bank of India**
Relationship beyond banking

**Nagpur Zone: 4th floor Bank of India Building, S. V. Patel Marg, Kingsway, Nagpur -440 001, Phone 0712-2557596**

**वाहन लिलाव/ विक्री सूचना**

बँक ऑफ इंडियाच्या अधिकृत अधिकाऱ्याने खालील वाहनांचा ताबा घेतला आहे. जनतेला कळविण्यात येते की बँकेच्या थकबाकी वसूल करण्यासाठी खालील प्रकरणांमध्ये शुल्क आकारलेल्या वाहनांचा ई-लिलाव “जसे आहे जिथे आहे तिथे आणि जसे आहे तिथे जे आहे" आणि "जेथे आहे तिथे" या तत्त्वावर वाहनांचा ई-लिलाव मेसर्स पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड च्या पोर्टलद्वारे https://baanknet.com खाली नमूद केलेल्या अटी आणि शर्तींवर केला जाईल.

**ई-लिलावाची तारीख व वेळ : दि. 12.11.2026 सकाळी 11 ते दुपारी 5 वाजेपर्यंत**

| शाखा | कर्जदारांचे नाव / जमीनदार | "थकबाकी रक्कम" | वाहनाचे तपशील | राखीव किंमत आणि ईएमडी रक्कम | शाखा अधिकाऱ्याचे नाव संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|---|
| आस्ति वसुली शाखा, नागपूर | श्री गुरुदयाल कामताप्रसाद सनोदिया | रु. 1.39 कोटी अधिक व्याज आणि इतर शुल्क | Commercial Vehicle Semi Trailor Reg. No. MH 40 CT 9095, Model - Bharat Benz 5528 TT 4X2 BS-VI Diesel (Prime Mover Only) Year of Mfg 02/2024. Google Map Location : Latitude : 21.095623, Longitude : 78.931558 | राखीव किंमत रु. 22,10,000/- ईएमडी रक्कम रु. 2,21,000/- | श्री अभय कुमार सिंह मोबाइल नंबर 7759809720 |
| | | | Commercial Vehicle CAB Chasis Reg No. MH 40 CT 5295, Model-Bharat Benz 5528 TT, 4X2 BS - VI Diesel (Prime Mover Only) Year Of Mfg. 01/2024. Google Map Location : Latitude : 21.095623, Longitude : 78.931558 | राखीव किंमत रु. 22,10,000/- ईएमडी रक्कम रु. 2,21,000/- | |
| | | | Commercial Vehicle Goods Carrier Truck Reg. No. MH 40 CT 7095 Model - Bharat Benz 4832 R 10X2 BS-VI Diesel Year Of Mfg. 07/2024. Google Map Location : Latitude : 21.095623, Longitude : 78.931558 | राखीव किंमत रु. 23,80,000/- ईएमडी रक्कम रु. 2,38,000/- | |

**इच्छुक/संभाव्य खरेदीदार 11.11.2026 रोजी संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत पीएसबी अलायन्स वॉलेटद्वारे 10% ईएमडी रक्कम जमा करू शकतात.**
**ई-लिलाव www.baanknet.com वर 12.11.2026 रोजी सकाळी 11.00 ते संध्याकाळी 5.00वाजेपर्यंत होईल.**
**उच्चतम बोली लावणाऱ्याने उर्वरित 90% बोली रक्कम विक्रीची पुष्टी झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास जमा केलेली रक्कम परत केली जाणार नाही.**
**वाहन पाहणी ची तारीख : 09.11.2026**
**बँकेस प्रक्रियेचा रद्द करण्याचा आणि/किंवा कोणतेही कारण न देता प्राप्त झालेल्या बोली नाकारण्याचा हक्क राखून ठेवलेला आहे.**

**अटी आणि शर्ती:** १. ऑनलाइन बोलीमध्ये सहभागी होण्यासाठी बोलीदारांना आमच्या ई-लिलाव सेवा प्रदात्या पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वेबसाइट (https://baanknet.com/) ला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. तांत्रिक सहाय्यासाठी कृपया ८२९१२२०२२० वर कॉल करा. नोंदणी/प्रशिक्षण स्थितीसाठी आणि ईएमडी स्थितीसाठी कृपया support.baanknet@psballiance.com वर ईमेल करा. २. वाहनाचे तपशील आणि वाहनाचे छायाचित्र आणि लिलावाच्या अटी आणि शर्तींसाठी कृपया https://baanknet.com ला भेट द्या आणि या पोर्टलशी संबंधित स्पष्टीकरणासाठी, कृपया PSB अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड, संपर्क क्रमांक ८२९१२२०२२० वर संपर्क साधा. ३. बोलीदारांना https://baanknet.com या वेबसाइटवर वाहन शोधताना प्रॉपर्टी आयडी क्रमांक वापरण्याचा सल्ला देण्यात येत आहे. ४. लिलाव कालावधीच्या शेवटी सर्वाधिक बोली लावणारा बोलीदार हा यशस्वी बोलीदार ठरेल आणि यासंदर्भातील कळवणी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दिली जाईल. ही कळवणी बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याच्या मंजुरीच्या अधीन असेल. यशस्वी बोलीदाराने विक्री मूल्याच्या २५% रक्कम (यामध्ये आधी भरलेली ईएमडी समाविष्ट आहे) त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवशी जमा करणे बंधनकारक आहे. विक्रीची पुष्टी झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री मूल्याची उर्वरित रक्कम जमा करावी लागेल. अन्यथा बँक, खरेदीदाराने आधीच भरलेली रक्कम (ईएमडीसह) जप्त करेल. देय रक्कम भरण्यात खरेदीदाराकडून झालेल्या अपयशाच्या परिस्थितीत, मालमत्ता दुसऱ्या क्रमांकाच्या बोलीदारास ऑफर केली जाऊ शकते किंवा पुन्हा विक्रीस काढली जाऊ शकते. अशा स्थितीत अपयशी खरेदीदारास कोणताही दावा करता येणार नाही. मालमत्तेवर लागू असलेले कोणतेही कायदेशीर व इतर थकित देयकांचे ओझे खरेदीदाराने स्वतः उचलावे लागेल. ५. मालमत्तेच्या विक्रीसंदर्भात बँक / अधिकृत अधिकारी यांचा निर्णय अंतिम, बंधनकारक व निर्विवाद राहील. बँकेस कोणतेही कारण न देता विक्री रद्द करण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. ६. यशस्वी खरेदीदार / बोलीदाराने सर्व विद्यमान / पूर्वीचे / भविष्यातील कर, शुल्क, दंड, हस्तांतरण फी इत्यादींचा भार स्वतः उचलावा लागेल . ७. बोलीची किंमत ही राखीव किमतीपेक्षा जास्त असावी आणि बोलीदाराने पुढील बोली रुपये 5,000/- च्या पटीत वाढवावी. ८. जीएसटी : बँकेच्या निर्धारित सूचनांनुसार लागू राहील व वाहनाच्या खरेदीदाराकडून वसूल करण्यात येईल. ९. वाहनाचे मूळ आरसी (Registration Certificate) व दुसरी किल्ली बँकेकडे उपलब्ध असल्यासच खरेदीदारास सुपूर्द करण्यात येईल. १०. अयशस्वी बोलीदाराने भरणा केलेली अनामत रक्कम **मेसर्स पीएसबी अलायन्स प्रा. लि.**च्या द्वारे संबंधित वॉलेटवर परत केली जाईल. त्यासाठी **मेसर्स पीएसबी अलायन्स प्रा. लि.** कडे अनामत रक्कम त्यांच्या बँक खात्यात परत करण्यासाठी निवेदन घ्यावे लागेल. सदर अनामत रक्कमेवर बोलीदारांना कोणताही व्याज, खर्च आणि इतर कोणतेही शुल्क (काही असल्यास) मागण्याचा हक्क असणार नाही.

**विशेष सूचना / सावधगिरीचा इशारा**

**बोलीदारांनी स्वतःच्या हितार्थ शेवटच्या मिनिटाला / सेकंदाला बोली लावणे टाळावे. अश्या केसेस मध्ये व्हेंडरच्या वतीने झालेल्या कोणत्याही चुका / अपयश (इंटरनेट खराबी, पॉवर बंद इत्यादी) साठी बँक ऑफ इंडिया किंवा सेवा प्रदानकर्ता कोणीही जबाबदार राहणार नाही. बोलीदारांना अशी विनंती करण्यात येते की त्यांनी अश्या प्रकारची आकस्मिक परिस्थिती टाळण्यासाठी तसेच बीड मध्ये यशस्वीपणे भाग घेता यावा यासाठी बँक अप पावर सप्लाय आणि इतर आवश्यक / पर्यायी साधनांची व्यवस्था करावी.**

तारीख : 14.10.2026 (मजकुरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.) अधिकृत अधिकारी

**कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन करा समृद्ध!

**रजिस्टर्ड ऑफिस :** ’कॉसमॉस भवन’, प्लॉट नं. ६, आयसीएस कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००७. फोन : ०२० - ६७०८ ५३०८/११

**स्थावर मालमत्ता विक्री नोटीस (नियम ८(६) सरफेसी कायदा, २००२ अन्वये)**

अधिकृत अधिकारी, कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि. यांनी खालील नमूद केलेल्या थकबाकीदाराचे दि सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये, बँकेने ताब्यात घेतलेल्या व खालील प्रमाणे नोंद केलेल्या स्थावर मिळकतीं टेंडरद्वारे **‘‘जशी आहे तशी’’** विक्री करुन विक्री रकमेतून कर्जाची वसूली करणे करीता इच्छुक खरेदीदारांकडून सीलबंद टेंडर्स मागवित आहोत.

| कर्जदार, गहाणदार, जामिनदारांचे नाव आणि शाखा | १३(२) मागणी नोटीस तपशील: दिनांक | १३(२) मागणी नोटीस तपशील: मागणी नोटीस रक्कम | ताबा दिनांक | विक्री/लिलाव तपशील: दिनांक | विक्री/लिलाव तपशील: वेळ |
|---|---|---|---|---|---|
| कर्जदार : **१. मे. लॅव्हिना इम्पेक्स, (कर्जदार) प्रोप्रायटर सौ. लता मुकेश जावंधिया (गहाणदार) यांच्यामार्फत, पत्ता-**प्लॉट नं. ६७२, जलालपुरा, पथ्थर फोड अखाडा, गांधीबाग, नागपूर-४४०००२ आणि **राहणार**-कोटेचा भवन, ८१८, पोथी गल्ली, न्यू इतवारी रोड, बागडगंज, नागपूर-४४०००२ **२. श्री. शारदाकुमार हरीदास जावंधिया (जामीनदार) पत्ता :** कोटेचा भवन, ८१८, पोथी गल्ली, न्यू इतवारी रोड, बागडगंज, नागपूर-४४०००२ **३. श्री. मुकेश शरदकुमार जावंधिया (जामनीदार) पत्ता :** कोटेचा भवन, ८१८, पोथी गल्ली, न्यू इतवारी रोड, बागडगंज, नागपूर-४४०००२ **शाखा : नागपूर** | ०८.०८.२०२५ | ₹ ५०,३१,१२१.२४ + व्याज व इतर चार्जेस | १०.०३.२०२६ | ३०.१०.२०२६ | दु. २:३० वा. |

**मिळकतीचे वर्णन :** नगरपरिषद बुटीबोरी, तहसील नागपूर ग्रामीण, जिल्हा नागपूर स्थित मौझा बोरी येथील खासरा नं. ७३, पी.एच.नं. ७६ मालीक मकबुजा कार्व्हड् लेआऊटनुसार या बिगरशेतजमिनीचे एकूण क्षेत्रफळ १४५०० चौ.मी.असून यामधील प्लॉट नं. १५ एकूण क्षेत्रफळ २११.५०० चौ.मी. पैकी सर्वसामाईक भागाचे क्षेत्रफळ २०३.७८० चौ.मी. सदर प्लॉटच्या **चतु:सीमा : पूर्वेस :** प्लॉट नं. १४, **पश्चिमेस :** ९.०० मीटर रस्ता, **उत्तरेस :** ९.०० मीटर रस्ता, **दक्षिणेस :** प्लॉट नं. १६.

| रिझर्व्ह किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|
| ₹ ४०,३६,०००.०० (₹ चाळीस लाख छत्तीस हजार फक्त) | ₹ ४,०४,०००.०० (रू. चार लाख चार हजार फक्त) |

**विक्री/लिलावाचे ठिकाण –** कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि., प्लॉट नं. ४, तळ मजला, सेंट्रल बाजार रोड, हॉटेल सेंट्रल पॉईंट समोर, रामदास पेठ, नागपूर-४४००१२ (फोन नं.: ०७१२/२४४४७६६/२४५४८२४)

**अटीं व शर्ती – १.** वरील प्रमाणे नमूद केलेली स्थावर मिळकत ही **‘‘जी आहे जेथे आहे, जशी आहे तशी, तेथे जे आहे’’**या तत्वावर विक्री केली जाईल. **२.** टेंडर दाखल करणेपुर्वी अधिकृत अधिकारी यांच्याशी सदर मिळकतीचे मालकी हक्क, टायटल व देयके इ. संदर्भात शहानिशा करून घेण्याची जबाबदारी खरेदीदार यांची राहील व नंतर याबाबत कुठल्याही प्रकारच्या तक्रारीची नोंद घेतली जाणार नाही. (टेंडर फॉर्म मिळण्याचे ठिकाणकॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि., प्लॉट नं. ४, तळ मजला, सेंट्रल बाजार रोड, हॉटेल सेंट्रल पॉईंट समोर, रामदास पेठ, नागपूर-४४००१२ (फोन नं.: ०७१२/२४४४७६६/२४५४८२४). **३.** इच्छुक खरेदीदार यांनी आपले बयाणा रक्कमेचे पे ऑर्डर/डीडीसह कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि. केवायसी सहित **दि. २९.१०.२०२६, सायं. ५.०० पर्यंत** पोहचेल असे पाठविण्यात यावे. बयाणा रक्कम आरटीजीएस/एनईएफटी फंड ट्रान्सफर द्वारे अदा करू शकता त्याचा तपशील पुढीलप्रमाणे – कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि. A/c No. 090370171, IFSC Code- COSB0000090 शाखा युनिव्हर्सिटी रोड, पुणे. **४.** इच्छुक खरेदीदार यांनी आपले टेंडर/ऑफर्स बयाणा रकमेचे पे ऑर्डर/डीडी सीलबंद पाकीटात घालुन व पाकीटावर **‘‘मे. लॅव्हिना इम्पेक्स, प्रोप्रायटर सौ. लता मुकेश जावंधिया यांच्या कर्जाच्या संदर्भातील मिळकत खरेदीसाठी टेंडर’’** असे स्पष्ट नमुद करावे. सदर विक्री/लिलाव आपल्यावर कायम न झाल्यास आपण भरलेली बयाणा रक्कम परत करण्यात येईल. तसेच रिझर्व्ह किंमतीपेक्षा कमी किंमतीला आलेले टेंडर्स/ऑफर्स विचारात घेतले जाणार नाही. सदर बयाणा रकमेवर व्याज दिले जाणार नाही. **५.** विक्री कार्यवाहीतील स्थावर मिळकतीबाबत आवश्यक ते टॅक्स, स्टॅम्प ड्यूटी, रजिस्ट्रेशन चार्जेस, टीडीएस व इतर सर्व आनुषंगिक खर्च नियमानुसार व वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार खरेदीदारास करावा लागेल. **६.** सर्व कायदेशीर देयके व इतर देयके, कर, दर, कर आकारणी, फी, दावे, चार्जेस, जीएसटी इ. जबाबदारी खरेदीदार यांची सर्वस्वीपणे राहील. **७.** सर्व टेंडर्स/ऑफर्स उघडल्या नंतर संभाव्य बोलीदारांना आपापल्या बोली वाढविण्याची संधी देण्यात येईल. बोली हस्तांतर करता येणार नाही. **८.** विक्री कार्यवाहीतील ज्या बोलीदाराची बोली सर्वात जास्त आहे अशा कायम केलेल्या बोलीदाराने २५% रकमेची (त्याच्या बोलीच्या) पुर्तता पुढील १ दिवसाच्या कार्यालयीन वेळेत करणे आवश्यक आहे. सदर रकमेमध्ये त्याने भरलेल्या बयाणा रकमेचा अंतर्भाव करण्यात येईल. सदर रक्कम ‘‘कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि.’’ A/c No. 090370171, आयएफएससी कोड – COSB0000090 शाखा युनिव्हर्सिटी रोड, पुणे यांच्या नावाने बँकर्स एनईएफटी/आरटीजीएस द्वारे अदा करण्यात यावी. सदर २५% रकमेची पुर्तता बोलीदाराकडून दिलेल्या मुदतीत न झाल्यास त्यांनी भरलेली बयाणा रक्कम कोणतीही पुर्वसुचना अथवा नोटीस न देता जप्त करण्यात येईल. **९.** २५% रकमेचा भरणा केल्यानंतर व अधिकृत अधिकारी यांनी विक्री/लिलाव कायम केल्यानंतर उर्वरीत ७५% रक्कम पुढील १५ दिवसांत कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक राहील. जर सदरचा भरणा सदर मुदतीत केला गेला नाही तर भरलेली २५% रक्कम जप्त करण्यात येईल व सदर स्थावर आणि जंगम मिळकतीची विक्री कारवाई पुन्हा करण्यात येईल. **१०.** मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी दिनांक **२७.१०.२०२६** रोजी **स. ११.०० ते दु.१.००** पर्यंत करण्यात येईल. **११.** बँकेच्या माहीतीप्रमाणे वरील नमूद मिळकतीवर कोणत्याही प्रकारची देणी नाहीत. **१२.** सदर लिलावाच्या टेंडर्स/ऑफर्स स्विकारणे न स्विकारणे, लिलाव कायम करणे, पुढे ढकलणे, रद्द करणे व इतर सर्व हक्क कोणतेही कारण न देता अधिकृत अधिकारी यांचे राहील. **१३.** विक्री/लिलावाच्या तपशिलवार अटीं व शर्ती लिलावाच्या वेळी व लिलावाच्या ठिकाणी वाचण्यात येतील. **१४.** सदर विक्री नोटीस ही बँकेच्या अधिकृत वेबसाईट म्हणजेच **www.cosmos.bank.in.** वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**टिप:– सदरची १५ दिवसांची नोटीस** नियम ८(६) एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट,२००२ अन्वये कर्जदार, जामिनदार व गहाणदार यांना सुध्दा लागू आहे.

**दिनांक : १४.१०.२०२६**
**ठिकाण :** नागपूर

**श्री. सचिन श्रीकुमार रणभोर**
अधिकृत अधिकारी व सहाय्यक महाव्यवस्थापक,
**कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

हे पत्र **मुद्रक आणि प्रकाशक विरेंद्र विद्याधर रानडे** यांनी मालक, दि इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - दि इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड), यांच्यासाठी लोकमत, प्लॉट नं. १९२, २०७ आणि २०८, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, बुटीबोरी, नागपूर-४४११०८ येथे छापून प्लॉट नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, अंबाझरी ले-आऊट, अंबाझरी, नागपूर-४४००१० येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी क्रमांक : २२३०४२१, २२३६८९७, फॅक्स क्रमांक : २२३६९८६. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४. दूरध्वनी : ०२०-६७२४१०००, फॅक्स : ०२०६७२४११४७. ■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : देवेंद्र गावंडे*** (*पी.आर.पी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Loksatta, RNI. No. 54743/92, Dated 30-4-92.
© दि. इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.